# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## राज्यातील जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवृत्त वेतनधारकांचे मासिक सेवानिवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन अदा करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१) १८७५७ (२५-०३-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय विभाग, सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थाचे सेवानिवृत्त व कुटुंब निवृत्तीवेतन हे प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीला सेवानिवृत्त धारकांच्या बँक खात्यात जमा होते परंतु जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सेवानिवृत्त व कुटुंब निवृत्ती वेतन हे विलंबाने सेवानिवृत्त धारकांना मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे वेतन थेट खात्यात जमा होते त्याचप्रमाणे तशी कार्यपध्दती जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थाना लागू करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद् अनुषंगाने राज्यातील जिल्हा परिषदाअंतर्गत पेन्शन घेणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेवर होणारा अन्याय दूर करण्याबाबत तसेच जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थाचे थेट बँक खात्यात निवृत्ती वेतन जमा होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.गिरीश महाजन (०७-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) राज्य शासकीय कार्यालयांतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती वेतन कोषागार स्तरावर निवृत्तीवेतन वाहिनी या आज्ञावली मार्फत केले जाते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या E-Kuber व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या C.M.P. प्रणाली द्वारे निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्याबाबतची कार्यवाही कोषागारामार्फत विहित वेळेत करण्यात येते.

जिल्हा परिषदेकडून सेवानिवृत्त झालेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्तीवेतन अदा करणेकरीता वर नमूद कोणतीही निवृत्तीवेतन प्रणाली अस्तित्वात नाही. सध्याच्या प्रक्रियेअंतर्गत वित्त विभागाकडून अनिवार्य खर्चाचे अनुदान ग्रामविकास विभागाकडे एकूण वार्षिक तरतुदीच्या साधारणपणे

८% प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस या विभागाकडे बिम्स प्रणालीवर वर्ग करण्यात येते. त्यानंतर सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या मागणीनुसार निधी वितरित करण्यात येतो.

जिल्हा परिषदांना निधी वाटप, जिल्हा परिषदांकडून निवृत्तीवेतन देयके तयार करून ती कोषागारात सादर करणे व अंतिमत: जिल्हा परिषदांकडून निवृत्तीवेतनाचे सेवा निवृत्तीवेतन धारकांना प्रदान करणे या कार्यपध्दतीकरीता लागणाऱ्या कालावधीमुळे सदर निवृत्तीवेतन अदा करण्याच्या प्रक्रियेस थोडा विलंब होत आहे. हा विलंब टाळण्यासाठी ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग व वित्त विभागासोबत समन्वय साधून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन प्रदानाकरीता स्वतंत्र नवीन प्रणाली मे.महाआयटी मार्फत विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## किंग्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, चेंबूर या विकासकाने भूखंडांवर स्मशानभूमी व मनोरंजन उद्यानाचे आरक्षण असतानाही पुनर्विकास प्रस्ताव सादर केल्याबाबत

**(२) १८७८२ (१९-०६-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किंग्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, चेंबूर, मुंबई या विकासकाने सायन चुनाभट्टी, मुंबई उपनगरातील न. भू. क्र. ३७३,२९५ सहित कित्येक भूखंडांवर स्मशान भूमी व मनोरंजन उद्यानाचे आरक्षण असतानाही चुकीच्या पध्दतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रा कार्यालयास पुनर्विकास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व भूखंडांवर म्हाडा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था अस्तित्वात असतानाही त्यातील फक्त चुनाभट्टी श्रमिक तसेच सायन श्री गुरुदत्त कृपा या म्हाडा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था एकत्रित करून सायन चुनाभट्टी श्री गुरुदत्त कृपा अशी नियोजित संस्था गठित केल्याचा ठराव दिनांक २ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास संमत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात दोन बैठका होण्याअगोदर किंग बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या एकमेव विकासकास नियुक्तपत्र देण्यात आले तसेच उक्त दोन्ही बैठकांचे आयोजन विधिवत नसून या दोन्ही बैठकाच्या कार्यवृत्तावर सूचक व अनुमोद स्वाक्षरी करणारे या दोन्ही संस्थेचे घरमालकही नसताना चुकीच्या कार्यवृत्ताच्या आधारे दिनांक ८ मे,२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकराण कार्यालयास पुनर्विकास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी पुनर्विकास करताना विकासकाने सदस्य व रहिवाशांना विश्वासात न घेता पुनर्विकास केला असल्याने याबाबत सखोल चौकशी करुन संबंधित विकासकावर कारवाई करण्याबाबत तसेच प्रकल्पात बाधित रहिवाशांना पूर्ववत घरे बांधून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

विकास नियंत्रण नियमावली १९९१ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०३४ नुसार सदर योजनेतील न.भू.क्र.३७३ हा भूखंड अनुक्रमे मनोरंजनाचे मैदान (RG) व Garden Park यासाठी आरक्षित आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र.११५२/२००२ (सिटीस्पेस व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदरचे आरक्षण विकसित करणे आवश्यक असल्याचा निर्णय दिनांक २५/०७/२०१४ च्या आदेशान्वये दिला होता.त्यामुळे सदरची योजना स्वीकृत करण्यात आली नाही.

तद्नंतर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम १७ (३)(डी) मध्ये मंजूर विकास आराखड्यातील मोकळ्या जागेच्या आरक्षणापैकी ३५% जागा आरक्षणासाठी राखून ठेवून उर्वरित ६५% जागेवर पुनर्वसन अनुज्ञेय करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार प्रकल्प स्वीकृत करण्याची विनंती योजनेचे वास्तुविशारद यांनी केल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील याचिका क्र.११५२/२००२ च्या अनुषंगाने विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विधि विभागाचे अभिप्राय आशयपत्रापूर्वी सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून योजना स्वीकृत करण्यात आली.

(२) न.भू.क्र.२९५ व न.भू.क्र.३७३, कुर्ला गांव, हिल रोड, सायन-चुनाभट्टी (पूर्व) या भूखंडावर सायन चुनाभट्टी श्री.गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना मे.किंग्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी प्राधिकरणास दिनांक २०/०६/२०१६ रोजी सादर केली होती. सदर प्रस्तावासोबत संस्थेने दिनांक ०२/०३/२०१४ रोजीच्या सभेचे इतिवृत्त सादर केले होते.

(३) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसन योजनेतील प्रस्तावित झोपडीधारकांनी घेतलेल्या सभेचे इतिवृत्त देण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र.१४४ प्रमाणे सर्व बाबींची पुर्तता करुन ही योजना दिनांक ०४/०४/२०१९ रोजी स्वीकृत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

न.भू.क्र.२९५ व ३७३ कुर्ला, गांव हिल रोड, सायन चुनाभट्टी (पूर्व) या भूखंडावर सायन चुनाभट्टी श्री गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) येथील झो.पु. योजनेसाठी विकासक मे.किंग्ज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सुधारित आशयपत्रानुसार पुनर्वसन इमारत ए विंग ही तळमजला २३ मजल्याची प्रस्तावित करण्यात आलेली असून या इमारतीत २३९ निवासी, ४३ प्रोव्हिजनल पी.ए.पी., ०८ सुविधा गाळे अशा एकूण २९० सदनिका या योजनेतील रहिवाशांसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याणकारी योजना राबविण्यासाठी युवकांसाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग स्थापन करणेबाबत

**(३) १९७८८ (०८-०८-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रीडा व युवक कल्याण खात्यातील कार्यरत असलेले क्रीडा विभागाचे अधिकारीच युवक कल्याण विभागाचा कार्यभार सांभाळत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, युवक कल्याण विभागामध्ये युवक कल्याण योजना अत्यंत मर्यादित असून पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, युवकांसाठी वेगळे मंत्रालय स्थापन करण्याची मागणी वेळोवेळी वेगवेगळया संघटना व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास युवकांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करून व्यापक प्रमाणात योजना राबविण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने युवकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्याकरीता निधीची उपलब्धता करुन देणे तसेच युवकांसाठी वेगळे मंत्रालय स्थापन करण्याच्या मागणीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (२५-०६-२०२४) :** (१) युवक कल्याण विषयाच्या सर्व योजना क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत व जिल्हा स्तरावरुन जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येतात.
(२) हे खरे नाही. शासनाकडून युवा कल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(३) याबाबतच्या निवेदनाची प्रत अभिलेख्यात आढळून येत नाही.
(४) क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून क्रीडा संबंधीच्या सर्व योजना तसेच युवक कल्याण संबंधीच्या सर्व योजना राबविण्यात येत असल्याने स्वतंत्र युवक मंत्रालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील श्री गणेश मंदिर टेकडी पर्यटन स्थळास ‘अ’ वर्ग दर्जा देणेबाबत

**(४) १९८०१ (०८-०८-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील श्री गणेश मंदिर टेकडी पर्यटन स्थळास ‘अ’ वर्ग दर्जा देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१६ व शुध्दीपत्रक दिनांक ८/३/२०१६ अन्वये दिलेल्या निकषात संपूर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी नागपूर, यांनी दिनांक १७/०३/२०१८ रोजी त्रृटींची पूर्तता करून स्वयं स्पष्ट अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी टेकडी गणेश मंदिराला पर्यटन क्षेत्राचा दर्जा देऊन निधी उपलब्ध करून देण्याचा मांडलेल्या प्रस्तावाला शासनाच्या पर्यटन विभागाद्वारे मंजुरी प्रदान करून केंद्र शासनाच्या पर्यटन विभागाला आवश्यक पुढील कार्यवाही करीता शासनाद्वारे सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संपूर्ण प्रस्तावाला मान्यता प्रदान करून केंद्र शासनाला प्रस्ताव सादर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०३-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही. सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यटन विभागास सादर करण्याची आवश्यकता नाही.
(३) पर्यटन विभाग, शासन निर्णय दिनांक ११/०३/२०२४ अन्वये सदर स्थळास 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला असून सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पोस्ट मॅपींगशिवाय वेतन अदा करणेबाबत

**(५) २१०६० (०५-०१-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन पोस्ट मॅपींग शिवाय होणार नाहीत असे माहे ऑक्टोंबर, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने पोस्ट मॅपींग शिवाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे सोबलगांव (ता.खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर) येथील लघु प्रकल्प दुरुस्तीबाबत

**(६) २१२९५ (०४-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोबलगांव (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे सन १९९० मध्ये लघु प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून सदर प्रकल्पात ८३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असल्यामुळे ४२१ हेक्टर लाभ क्षेत्र झाले आहे तर ६.३० कि.मी.च्या तीन वितरिका आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातून ५ गावांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली असून पाट (कालवा) पूर्ण ना दुरुस्त असून झाडझुडपांनी बंद झाल्यामुळे लाभ क्षेत्र घटत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे सोबलगाव लघु प्रकल्पाचे काम सन १९९० मध्ये पूर्ण झालेले असून प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र ८३ हेक्टर इतके आहे, तर लाभक्षेत्र ४२१ हेक्टर इतके आहे. सदर प्रकल्पाचा मुख्य कालव्याची लांबी २.०८ किमी असून त्यावर ३.८८ किमी, १.७८ किमी व ०.५६ किमी अशा एकूण ३ वितरीकांची लांबी ६.२२ किमी इतकी आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्पांमधून शेकपूरवाडी, बाजारसावंगी, पाडळी व सोबलगाव या चार गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना माहे नोव्हेंबर २०१७ पर्यंत कार्यान्वित होत्या. परंतु सदरील गावांच्या मागणीनुसार सदर योजना रद्द करण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत एकही पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित नाही. सदर प्रकल्पाचे बांधकाम हे २४-२५ वर्ष जुने असून कालवा व कालव्यावरील बांधकामाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सदर प्रकल्पाची कालवा वितरण प्रणाली नादुरुस्त असल्यामुळे लाभक्षेत्रात घट झालेली आहे.

(३) सदर प्रकल्पाची कालवा वितरण प्रणाली पुनश्चः कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने कालवा दुरुस्तीची, सांडवा दुरुस्ती व मुख्य सेवापथ दुरुस्तीचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता देणेबाबत

**(७) २१३२४ (०५-०१-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना ४२ टक्के महागाई भत्ता मिळत असून राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मात्र ३४ टक्के महागाई भत्ता मिळत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता दिला जाईल, अशी घोषणा शासनाने करुनही त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही झाली नसल्यामुळे राज्य परिवहन महामंडळातील (एसटी) अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असून सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन त्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) नाही.

(२) व (३) शासन पत्र दिनांक ०४ ऑक्टोंबर २०२३ अन्वये, सुधारीत वेतनश्रेणीतील रा.प.अधिकारी / कर्मचारी यांना ३८ टक्केवरुन ४२ टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे.

---

## महाज्योतीच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महा वाड:मय तयार करण्याच्या निर्णयाबाबत

**(८) २१३५७ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योतीच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महा वाड:मय तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासाठी किती रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच किती कालावधीत या महा वाड.मयाची निर्मिती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्यात या महा वाड:मयाचे वितरण कशाप्रकारे करण्यात येणार आहे, त्यासाठी निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०६/१०/२०२३ रोजी झालेल्या महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत महाज्योती मार्फत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित वाड:मय प्रसिध्द करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या करीता रुपये २.४३ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

(२) महा वाड:मयाचे वितरण हे प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ, प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सहायक आयुक्त, समाज कल्याण याचे मार्फत करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी यांत्रिकीकरण उप अभियान राबविण्याबाबत

**(९) २१३८० (०३-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-१५ पासून कृषी यांत्रिकीकरण उप अभियान राबविण्यात येत असून, सदर अभियान राबविण्यात राज्य पिछाडीवर गेले असून यावर्षी जवळपास २५ हजार शेतकऱ्यांचे १४४ कोटी रुपयांचे अनुदान थकले असून चालू वर्षात सोडतदेखील काढण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ९५ कोटी रुपयांचे जादा अनुदान प्रस्ताव मंजूर केले गेले आहेत, आधीच्याच प्रस्तावांना अनुदान दिले गेले नसताना पुन्हा नवे प्रस्ताव मंजूर केल्याने अनियमितता वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत शेतकऱ्यांचे थकीत अनुदान अदा करून, सदर अभियान सुरळीतपणे राबविण्याच्यादृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०६-२०२४) :** (१) व (२) राज्यात सन २०१४-१५ पासून कृषी यांत्रिकीकरण उपअभियान राबविण्यात येते. सदर अभियान राज्यात यशस्विरित्या राबविण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये लॉटरी काढण्याच्या दिनांकापर्यंतचे सर्व लाभार्थ्यांचे अर्ज लॉटरीसाठी ग्राह्य धरुन लाभार्थीची निवड करण्यात आली. त्यामुळे सन २०२२-२३ मधील प्रलंबित अनुदान देय लाभार्थी संख्या जास्त आहे.
(३) व (४) कृषी यांत्रिकीकरण उपअभियानातून सन २०२३-२४ मध्ये २१३३० लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सदर योजना राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (Umbrella scheme) असल्याने यामध्ये सर्व समाविष्ठ सर्व योजनांचा ७५ टक्केपेक्षा जास्त खर्च झाल्यानंतरच केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो.

---

## राज्यातील नवसंजीवनी योजनेतील मानसेवी वैद्यकीय आधिकाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याबाबत

**(१०) २१३९० (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी दुर्गम-नक्षलवादी परिसरात गोरगरिबांना सेवा देणारे नवसंजीवनी योजनेतील अनेक मानसेवी वैद्यकीय आधिकारी आजही कायमस्वरुपी सेवेत समाविष्ट झालेले नसून या वैद्यकीय अधिकाऱ्यांना अवघे ४० हजार रुपये मानधन मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासनसेवेत कायमस्वरुपी करुन त्यांचे मानधन वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्रातील १६ आदिवासी जिल्ह्यातील भरारी पथकात एकूण २७० मानसेवी वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरुपात कार्यरत आहेत. सदर कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचे समावेशन शासन अधिसुचना दिनांक ३०/११/२०१२ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी गट ब संवर्गाच्या रिक्त पदावर करण्यासंदर्भात विचार करण्यात येत आहे.
(२) वरीलप्रमाणे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रामपूर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील धरणाचा दायित्व यादीत समावेश करणेबाबत

**(११) २१६३९ (०५-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामपूर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत लघु पाटबंधारे योजना धरण प्रकल्प सन २००० मध्ये मंजूर करण्यात आला असून, सदर प्रकल्पाचा दायीत्व यादीत समावेश नसल्यामुळे उर्वरीत कामे बंद झाल्याने हजारो आदिवासी कुटुंबिय सिंचनापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरण प्रकल्पाचे नाव दायीत्व यादीत समावेश करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने लघु पाटबंधारे योजना धरणाचे नाव दायीत्व यादीत समाविष्ट करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

रामपूर ल.पा. प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता सन-१९८० मध्ये मिळाली.सन-१९९६ मध्ये पुन:प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. तद्नंतर प्रकल्पास सन-२०२१ मध्ये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये ३९.७३ कोटी इतकी प्राप्त झालेली आहे. प्रकल्पाचे काम ७५% पूर्ण झालेले आहे.

प्रकल्पाच्या जलरोधक खंदकाची व सांडव्याची पाया पातळी खोल गेल्याने व सुधारीत मंजूर संकल्पना नुसार तसेच दगडी बांधकाम ऐवजी संधानकाचा वापर तसेच धरणासाठी आवश्यक काळी माती उपलब्ध होत नसल्याने काळी मातीच्या उपलब्धतेसाठी अतिरिक्त वहन अंतरामुळे अतिरिक्त दायित्व निर्माण झालेले आहे.

सदर प्रकल्पाचा शासन निर्णय दिनांक २४/०६/२०२१ अंतर्गत दायित्व यादीत समावेश नाही. दायित्व मान्यतेअभावी कामे सद्य:स्थितीत बंद आहेत. दायित्व मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

(२) श्री.विजयकुमार गावीत, मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग व पालकमंत्री,नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०२/२०२३ रोजी मा.मंत्री महोदयांचे समिती कक्ष दालन क्र.२०५ (विस्तार) ची मंत्रालय, मुंबई येथे नंदुरबार या आदिवासी बहूल जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पांच्या आढावाबाबत झालेल्या बैठकीत तापी पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावरील दायित्वाच्या प्रस्ताव शासन स्तरावर नियामक मंडळाच्या बैठकीत सादर करणेसाठीचा प्रस्तावावर चर्चा झाली आहे. सदर बैठकीत सदर कामांचा अतिरिक्त दायित्व प्रस्तावास सक्षम स्तरावरुन त्वरेने मान्यता घ्यावी, आवश्यकतेनुसार प्रकल्पाचे नाव शासन निर्णयात अतर्भुत होण्याच्या दृष्टीने महामंडळाचे नियामक मंडळामार्फत प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

(३) प्रकल्पाचा स्विकृत निविदेवर अतिरिक्त दायित्व निर्माण झाल्याने दिनांक २४/०६/२०२१ च्या शासन निर्णय अन्वये यादीत नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव महामंडळाचे पत्र क्र. कासं/तापविम/प्रशा-५/२५३१, दिनांक १३/०७/२०२२ अन्वये तसेच महामंडळाचे पत्र क्र.कासं/तापाविम/ पशा-२/ १५१७,दिनांक ३१/०३/२०२२ अन्वये मंजूरीस्तव शासनास सादर केलेला आहे.

शासन निर्णय दिनांक २२/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार दायित्व मान्यतेसाठी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यासाठी शासन निर्णय दिनांक २४/०६/२०२२ सोबतच्या यादीमध्ये सदर योजनेचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार रामपुर लघु पाटबंधारे योजनेचा शासन निर्णय दिनांक २४/०६/२०२१ सोबतच्या यादीमधे समावेश करणेसाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या ६७ व्या नियामक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ६७.१५ अन्वये नियामक मंडळाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सहकारी सुतगिरणीच्या नोंदणी धोरण व निकषांमध्ये शिथिलता आणणेबाबत

**(१२) २१८२० (०३-०१-२०२४) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी सुतगिरणीच्या नोंदणी धोरण व निकषांबाबत दिनांक १८ मार्च, २०२३ रोजी सहकार विभागातर्फे शासन निर्णयानुसार सहकार धोरणाद्वारे सहकारी सुतगिरणी नोंदणीकरीता यापूर्वी सभासदांची किमान मर्यादा १२५ अशी होती, नविन आदेशानुसार ती संख्या किमान १००० अशी सदस्य सभासद संख्या करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात सहकारी धोरणावर आधारित सुतगिरणी निर्माण करून ग्रामीण भागातील उत्पादित शेतमालांना योग्य भाव तथा स्थानिक उत्पादन घेवून सहकार तत्वावर शेतकऱ्यांसोबत सहकारी सुतगिरणी स्थापन करून आर्थिक विकास होणेकरीता वाढविलेली सभासद मर्यादा जास्त असल्याने ग्रामीण भागामध्ये सुतगिरणी उभारण्याकरीता नोंदणी प्रक्रिया करताना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सहकारी सुतगिरणीच्या नोंदणी धोरण व निकषाबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित करून सभासद संख्या २०० पेक्षा कमी करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०५-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांचे दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्वसाधारण, मागासवर्गीय व आदिवासी सहकारी सूतगिरण्यांकरीता किमान सभासद संख्या १००० केलेली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम २२ मध्ये सहकारी संस्थेची सदस्य कोणती व्यक्ती होवू शकेल, याबाबतची तरतूद आहे. परंतु सदर नियम हा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी असल्याने विशिष्ट वर्गाच्या सहकारी संस्थांची नोंदणी करताना किती सभासद संख्या असावी याबाबतची तरतूद नाही. तथापि, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ६ नुसार सहकारी संस्थेच्या नोंदणीबाबतचे Norms & Conditions ठरविण्याचे अधिकार निबंधकांना दिलेले आहेत. सदर अधिकाराचा वापर करुन उपरोक्त सभासद संख्या निर्धारीत केलेली आहे. आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांनी त्यांच्या अधिकारात निर्धारीत केलेल्या सभासद संख्येबाबत आक्षेप असल्यास त्याबाबत अर्धन्यायिक स्वरुपात मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्याकडे अपील दाखल करता येते.

(४) लागू नाही.

---

## आद्यक्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा जीवन प्रवास शालेय शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत

**(१३) २१८३६ (०५-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात आदिवासी जमातीच्या लोकांना बळजबरीने धर्मांतर करण्यास भाग पाडणाऱ्या इंग्रजाविरुध्द लढा देणाऱ्या आद्यक्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा जीवन प्रवास शालेय शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रचलित अभ्यासक्रमानुसार बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आधारित आशयाचा समावेश पाठ्यपुस्तकांमध्ये करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसनाची प्रक्रिया सुरु असून त्यावर आधारित शालेय शिक्षणाच्या नवीन अभ्यासक्रमाची रचना करताना शालेय अभ्यासक्रमात बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्राचा समावेश करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही राज्य अभ्यासक्रम आराखडा व राज्य अभ्यासक्रम निर्मिती समितीच्या निर्णयानुसार करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरण पाणी साठवण क्षेत्रातील गाळ संचयन कमी करणेकामी उपाययोजना करणेबाबत

**(१४) २१८४४ (०४-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणातील पाणी साठवण क्षमतेच्या ५२ टक्के गाळाने भरलेले असून धरणातील गाळाचे संचयन कमी होण्यासाठी मेरी या संस्थेने ८ विस्तारित वक्राकार दरवाजांचे काम केले असून सदरचे काम गत १३ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरण पाणी साठवण क्षेत्रातील गाळ संचयन कमी करणेकामी उपाय योजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत मे, २०१८ मध्ये केलेल्या अभ्यासानुसार हतनुर धरणाच्या बुडीत क्षेत्रात एकूण १७४.७० द.ल.घ.मी. गाळ साचला असून यापैकी मृत साठ्यात १०८.३३ द.ल.घ.मी. तर जिवंत साठ्यात १०३.५०४ द. ल. घ. मी. (५४.५५ %) इतका आहे.

गाळ साचल्यामुळे मूळ तापी व पूर्णा नद्यांच्या काटछेदातील पाणी वहनासाठी उपलब्ध क्षेत्र (Cross Sectional area) कमी होत आहे. काटछेदातील क्षेत्र कमी होत असल्याने त्या त्या ठिकाणी पाणी पातळी वाढून लगतच्या क्षेत्रात पाणी घुसते व नव्याने पूनर्वसनाच्या मागण्या येत आहेत. ही बाब टाळणेसाठी अतिरिक्त ८ दरवाजांचे कामास दिनांक २९/१०/२००२ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे व कामे प्रगतीत आहेत.

(२) हतनूर धरण पाणी साठवण क्षेत्रातील गाळ संचयन कमी करणेकामी अतिरिक्त ८ दरवाजे यांचे बांधकाम डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून सद्य: स्थितीत सदर काम ५५ % पूर्ण झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाबळेश्वर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र खाजगीरित्या चालविण्यास देण्याबाबतच्या शासन निर्णयासंदर्भात

**(१५) २१९७५ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महाबळेश्वर तालुक्यातील (जि.सातारा) ग्रामीण रुग्णालय आणि तळदेव व तापोळा ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याअंतर्गत येणारी १४ उपकेंद्र प्रायोगिक तत्वावर ५ वर्षाकरीता चालविण्यास देण्याबाबत मुदतवाढीचे शासन पुरक परिपत्रक सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये नमुद केलेले ग्रामीण रुग्णालय, दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्याअंतर्गत येणारी १४ उपकेंद्रे ही प्रत्यक्षात इंडियन रेड क्रॉस सोसायटी पाचगणी (तालुका महाबळेश्वर) संचलित बेल-एअर हॉस्पिटल या संस्थेस केंव्हापासून, चालविण्यात देण्यात आलेली आहेत व त्याबाबतच्या अटी व शर्ती तसेच करारनाम्यात काय नमूद करण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुगणालय, प्राथमिक आरोग्य केंद्र ही अन्य खाजगी संस्थेला चालविण्यात देणार असताना त्यासाठी शासनाने अनुदान व आर्थिक तरतुद करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजीचा सदर शासन निर्णय हा दिनांक ७ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन मुदतवाढीबाबतचे पुरक पत्र असल्याचे लक्षात घेता, सदर योजना माहे जून, २०२३ पासून अंमलात आली होती काय तसेच मुदतवाढीबाबतचे पुरक पत्रक निर्गमित करण्यामागील कारणे काय आहेत,

**डॉ. तानाजी सावंत (०४-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ७/०६/२०२३ अन्वये महाबळेश्वर तालुक्यातील (जि.सातारा) ग्रामीण रुग्णालय आणि तळदेव व तापोळा ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्र व त्या अंतर्गत येणारी १४ उपकेंद्र प्रायोगिक तत्वावर पुढील ५ वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठीचे खर्चाचे लेखाशीर्ष नमूद करुन सदर शासन निर्णयामध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबतचे पुरक पत्रक दिनांक ४ ऑक्टोबर,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(२) व (३) यापूर्वी महाबळेश्वर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय तसेच तळदेव व तापोळा ही दोन प्राथमिक आरोग्य केंदांच्या अंतर्गत येणारी १४ उपकेंद्र प्रायोगीक तत्वावर दिनांक ३१/०३/२०२८ पर्यंत चालविण्यास अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात आली आहे. शासन निर्णयामध्ये अटी व शर्ती नमूद केल्या आहेत. शासन निर्णय राज्य शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या अटीच्या अधीन राहून जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शासनाच्या वतीने संस्थेशी करारनामा स्वाक्षरीत केला आहे.

इंडीयन रेड क्रॉस सोसायटी संचलित पाचगणी (महाबळेश्वर) जि.सातारा येथील बेल एअर हॉस्पीटल या खाजगी संस्थेस सदर रुग्णालये चालविण्याकरीता झालेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी शासनामार्फत अनुदान देण्यात येते.

(४) कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

---

## राज्यातील शिक्षकांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकामार्फत करण्याबाबत

**(१६) २२०३९ (०५-०१-२०२४) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक माध्यमिक, प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत होत असून राष्ट्रियकृत बँकेतून मिळणारे लाभ हे जिल्हा बँक व इतर बँकापेक्षा चांगले असल्याने अहमदनगर व जळगाव जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेतच होणेबाबत शिक्षकांकडून मागणी केली जात आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शाळांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत अथवा core banking सुविधा असलेल्या बँकांमध्ये उघडण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करावे असे मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झाालेल्या बैठकीमध्ये निर्देश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत अथवा core banking सुविधा असलेल्या बँकांमध्ये उघडण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याबाबत तसेच अहमदनगर व जळगाव शिक्षकांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विभागाच्या दिनांक १९/१२/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी न मिळाल्याने आत्महत्या केल्याबाबत

**(१७) २२०५६ (०५-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील चंद्रभागाबाई एलगुलवार प्रशालेतील शिपायाने तेरा वर्षांपासून वेतन होत नसल्याने व शालार्थ आयडी न मिळाल्याने नैराश्यातून आत्महत्या केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले व तदनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली असणे किंवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी नियमानुसार चौकशी करण्याबाबतच्या सुचना दिनांक ११/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) येथे उपसा सिंचन योजनेमध्ये निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत असल्याबाबत

**(१८) २२२४० (०४-०१-२०२४) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) येथील उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीमध्ये निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले असून शेतकऱ्यांना पंप हाऊस रंगरंगोटी कामाचे कोणतेही देयके न देता त्यांच्याकडून अवाजवी रक्कम वसूल करण्यात येणे, कित्येक ठिकाणी पाईपलाईनमध्ये गळती असणे, अनधिकृत कनेक्शन देणे, पंप हाऊसवर निकषानुसार पाणी वाटप न होणे या बाबी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व शेतकरी यांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेकरीता वारंवार निकृष्ट दर्जाची कामे करणे व सुरक्षा रक्षक न पुरविणे तसेच शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपसा सिंचन योजनेमध्ये निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०२४) :** (१) नाही.

पुरंदर उपसा सिंचन योजनेसाठी बिगर सिंचन प्रापणसुचीत मंजूर असलेली तसेच मंजूर सुप्रमा अंतर्गत समाविष्ट असलेली कामे करण्यात येतात व सर्व कामे क्षेत्रिय स्तरावर निविदा अटी शर्ती नुसार करण्यात येतात.

तसेच शासन नियमानुसार दरवर्षी उपसा सिंचन योजनेचे पाणीपट्टी दर मंजूर करुन घेऊन त्यानुसार लाभधारक शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी वसुली करण्यात येते. तसेच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार व प्रकल्प अहवालानुसार समन्यायी पध्दतीने पाणीवाटप करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
सर्व कामे क्षेत्रिय स्तरावर निविदा अटी शर्ती नुसार करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी पूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना सक्तीच्या कार्य प्रशिक्षणाबाबतच्या (INTERNSHIP) मार्गदर्शक सुचनांच्या मसुदयाबाबत

**(१९) २२३७३ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी पूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना सक्तीच्या कार्य प्रशिक्षणाबाबतच्या (INTERNSHIP) मार्गदर्शक सुचनांचा मसुदा प्रसिध्द केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणानुसार ३ वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांना ६० ते १२० तास व ४ वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प पूर्ण करावा लागणार असून विद्यार्थ्यांना त्यानुसार १२ श्रेयांक मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोरणानुसार युजीसीने संबंधित मसुद्यावर दिनांक १२ नोव्हेंबर, २०२३ रोजी पर्यंत हरकती व सुचना मागितल्या असून वेगवेगळया विद्यार्थ्यांमधुन व उच्च व तंत्र शिक्षण विभागातून काही सुचना पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हे धोरण लागु करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी पूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना सक्तीच्या कार्य प्रशिक्षणाबाबतच्या (INTERNSHIP) मार्गदर्शक सुचनांबाबतचा मसुदा प्रसिध्द केला होता.तसेच, हा मसूदा विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतिम करुन त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विद्यापठे तसेच महाविद्यालये यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०२/०२/२०२४ च्या पत्रान्वये केल्या आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षमता व उद्योजकता वाढावी म्हणून आंतरवासितेच्या माध्यमातून उद्योग-शिक्षण संबंध वाढीसाठी विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांनी मोठी भूमिका बजावणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने त्यांनी औद्योगिक जगत, एमएसएमई, व्यावसायिक आस्थापना, बँक व वित्तीय संस्था, अशासकीय संस्था इत्यादींच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना आंतरवासिता/ अप्रेंटिसशिप उपलब्ध करुन देण्याचा यशस्वी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन विद्याथ्यांसाठी आंतरवासिता उलब्ध करुन देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केली आहेत.

तसेच, राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या प्रशासकीय विभागांकडून आंतरवासिता उपक्रम निर्माण करण्यासाठीच्या

धोरणाची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याबाबतच्या सूचना दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ च्या शासननिर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील तालुक्यांची नावे इयत्ता तिसरीच्या परिसर अभ्यास या विषयाच्या पुस्तकातील नकाशात चुकीची छापण्यात आल्याबाबत

**(२०) २२४४४ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातर्फे (बालभारती) छपाई केलेल्या इयत्ता तिसरीच्या मराठी माध्यमाच्या परिसर अभ्यास या विषयाच्या पुस्तकातील नकाशात पालघर जिल्ह्यातील तालुक्यांची नावे चुकीची छापण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा तालुक्याचा उल्लेख या नकाशात वाडे, तर मोखाडाचा उल्लेख मोखाडे असा असल्यामुळे पालकांनी याबाबत तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातर्फे (बालभारती) छपाई केलेल्या इयत्ता तिसरीच्या मराठी माध्यमाच्या परिसर अभ्यास या विषयाच्या पुस्तकातील नकाशात पालघर जिल्ह्यातील तालुक्यांची चुकीची नावे दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे आजअखेर कोणत्याही पालकांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

राज्य शासनाने प्रादेशिक भाषेतील प्रमाणभूत स्थलनामांतराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, १९८७ नुसार समिती गठीत केली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने मराठी स्थलनाम सूची तयार केली आहे. सदर सुचीतील विविध स्थलनामांचा वापर पाट्यपुस्तकात करण्यात येतो.

महाराष्ट्र राज्य पाटयपुस्तक निर्मिती मंडळाच्या पाठ्यपुस्तकांत सन १९६९ पासून स्थलनामांचा उल्लेख वाडे व मोखाडे असाच करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.